Review of Virgaon Loksamiti office — by
Dr. Ashikant Ahankari (Vaijapur)

July / 1977

## ग्रामीण भागातील 'युक्रांदचे कार्य'

### वीर गांव लोकसमितीच्या कार्याचा आढावा.

केंद्रामध्ये बहुमताने जनता पक्ष सत्तारूढ झाला आणि लगेच जयप्रकाशांनी दक्षता समिती स्थापन करण्याचे आवाहन केले. त्या आवाहनानुसार जून ७७ मध्ये ता. वैजापूर (औरंगाबाद जिल्हा) इथे युक्रांदतर्फे तालुका पातळीवरील युवक मेळावा आयोजीत केला. सर्कलवाईज कामास सुरु करण्याचे ठरले.

आणि वीरगांव इथे १७ जून रोजी युक्रांदचे डॉ. शशिकांत अहंकारी, सुभाष लोमटे यांनी दक्षता समिती स्थापन केली. दक्षता समिती स्थापन करीत असतांना. गांवामध्ये चाललेला सार्वजनिक क्षेत्रातील भ्रष्टाचार काळा बाजार या दोंद्यबरोबरच विधायक रचनात्मक कार्य म्हणून ग्राहक सहकारी संस्था ई. कार्यक्रम पण देण्यात आले . या समितीचे संघटक बाबासाहेब जगधणे झाले.

वीरगांवात कित्येक महिन्यापासून रेशन दुकानावर साखर मिळत नव्हती. स्वस्त धान्याचे दुकान माजी, सरपंच श्री साहेबराव बारसे पाटील चालवत. तेच सोसायटीचे चेअरमन आणि वडील श्री. वैजनाथ पाटील गावचे पोलीस पाटील घरच्या लग्नासाठी आणि काळाबाजारासाठीच साखर वापरली गेली. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तहसीलदार वैजापूर जिल्हाधिकारी औरंगाबाद, पुरवठा मंत्री , मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अर्ज केला. या प्रकरणाची चौकशी होऊन , साहेबराव बारसे कडून दुकान काढून घेण्यात आले. व रजिष्टर जप्त केले. स्वस्त धान्य दुकान श्री. गुलाबराव पाटील सरंपच यांना सर्वांच्या समंतीने देण्यात आले. तेंव्हापासून सर्व धान्य व साखर नियमप्रमाणे प्रत्येक गांवकऱ्यास मिळते. या प्रकरणामुळे गांवकऱ्याची दक्षता समितीच्या तरुण कार्यकर्त्याविषयी सहानुभूती वाढली व सभासद वाढले. गांवातील दबावाच्या विरोधात लोकांनी उभे राहण्याची तयारी दर्शविली.

गांवातील विकास कार्यकारी सोसायटीमधील अफरातफरीची चौकशी करण्यासाठी अर्ज जाईंट रजिस्ट्रार औरंगाबाद सहकार मंत्री यांना केला. त्याची चौकशी केल्यानंतर सुमारे दहा-बारा हजाराची अफरातफर झाल्याचे निदर्शनास आले. ग्रामपंचायत वीरगांवसाठी दिलेले रोजगार हमी योजना व इतर पैशाच्या व्यवहारातही अप - व्यवहार केला होता. तो पण उघडकीस आला. एवढेच काय ग्रामपंचायतीचा रेडिओ माजी सरपंचाच्या घरीच होता. तो बाहेर आणल्यामुळे गांवकऱ्यांना नियमीत बातम्या ऐकण्याची संधी मिळाली .

वीर गांवातील शेतकऱ्यावर तलाठ्याचा दंडेलपणा खुप दिवसापासून चालू होता. सात बाराच्या उताऱ्यासाठी पांच रुपये लाच द्यावी लागायची तर कित्येक वर्षा पासूनचे फेरफार तसेच पडूनहोते. वडील वारल्यानंतर मुलांच्या नांवे करायचे फेर सुध्दा २५-३० वर्षापासून पडून होते. आणि या फेरफारास दोनशे तीनशे रु. असे पैसे तलाठी मागायचा .

गांवमधील ४०-५० शेतक-यांनी तहसीलदारांस समितीच्या मार्फत अर्ज केले. सोबत पैसे मागीतल्याची तक्रार पण केली. १५ ऑगस्ट च्या दिवशी तलाठी व गिरधावर यांनी मिळून जवळ जवळ ४० फेरफार करून दिले. तसेच शेतक-याने पट्टी भरून त्याच्या पावत्या तलाठ्याकडून घेतल्या असून सुध्दा त्या च्या नांवे ५ वर्षाची थकबाकी खात्यावर लावली होती. शेतक-यावरील हा कर्जाचा बोजा कमी करावा म्हणून अर्ज केले. त्याची चौकशी होऊन सत्य उघडकीस आले. या प्रकरणामुळे चिडून जाऊन तलाठ्याने गांवात आपसापसात भांडणे लावून देण्यास सुरुवात केली. विनाकारण पेर दुस-याच्या नांवे लावून देणे असा प्रकार चालू केला य.

या कार्याबरोबर गांवाला विज लवकर मिळावी म्हणून प्रयत्न केले व मंजूरी मिळवली. सुशिक्षित बेकारांना उद्‍योग धंदे सुरु करण्यासाठी विकास महामंडळाकडून कर्ज मिळण्यासाठी अर्ज करण्यात आले आहे.

ऑगस्ट मध्ये बोरगांवला शेतकरी व शेतमजूराचा मेळावा आयोजीत केला. सामाजिक समतेच्या प्रश्ना संदर्भात मार्ग दर्शन प्रा. ी अविनाश डोळस यांनी केले. नांदूर-मधमेश्वर पाण्या संदर्भात आंदोलन सुरु करण्यासाठी पूर्व तयारी करण्यास सुरवात केली. या मेळाव्यास ॲड. उत्तमराव पटवारी चिटणीस जनता पक्ष वैजापूर ता. श्री कृष्णराव पिलदे सुभाष लोमटे , डॉ. शशीकांत अहंकारी वैजापूर युक्रांद यांनी मार्ग दर्शन केले.

या कामामध्ये ज्या च्या हितसंबंधाना धक्का पोहोचला ,अशानी खोटया फौजदा-या , करण्यास सुरुवात केली. श्री. वेणूनाथ पाटील हे स्वत: पोलीस पाटील असल्यामुळे व गांवातील हेड कॉन्सटेबल श्री. घुमरे यांच्या साहयाने त्यांना पैसा खाऊ घालून समितीतील कार्यकर्त्यांवर केसेस करण्यास सुरुवात केली. तरी पण या दबावात गांवकरी बळी पडले नाहीत. अशा बोस तरी खोटया केसेस सद्या कोर्टात चालू आहे. पोलीस पाटील स्वत: गुन्हेगार असल्यामुळे , गांवातील गरीब शेतक-यावर अन्याय करीत असल्यामुळे त्यांच्या विरुध्द तक्रार अर्ज तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना दिला. त्याची पूर्ण चौकशी होऊन पोलीस पाटलास निलंबीत करण्यात आले.

बोरगांवाचा रहिवाशी असलेल्या श्री. दामोधर साबळे सैनिक भारतीय संरक्षण विभाग यांची पत्नी सौ. इंदूबाई साबळे या दलित जातीतील स्त्रीवर गांवातील जनावरांच्या दवाखान्यातील लस्टॉक सुपरवायझर श्री. बेलकर यांनी बलत्कार करण्याचा प्रयत्न केला. पण तबडतोब समितीच्या कार्यकर्त्यांनी स्त्रीचा आवाज ऐकुण धाव घेतली. श्री. बेलकर यांस आता निलंबीत करण्यात आले आहे. औरंगबादच्या विभागीय कमीशनर साहेबांनी समितीस याबद्दल अभिनंदन पत्र पाठविले आहे.

श्री. बबनराव आसवले या मातंग समाजातील गांवक-याची मुलगी कु. केशवबाई हिस बरोबर दसूपाटील (वेणूनाथ पाटलांचा पूतण्या) याने दबरदस्तीने अनैतिक संबंध ठेवले. असा अर्ज समितीकडे आला. त्याची पूर्ण चौकशी करता त्या १४ वर्षाच्या मुलीला फसविल्याचे दिसून आले.

तिला गर्भ राहिला होता. तीचा गर्भ पात करण्याचे प्रयत्न झाले म्हणून दक्षता समितीतर्फे व पालकांतर्फे डी.एस.पी. डी.आय.जी. व डी.आय.एस.पी. यांची भेट घेतली. अर्ज केले. दोन महिने लोटले पण कार्यवाहि झालीच नाही. म्हणून प्रंतप्रधान श्री. मोरारजी भाई देसाई यांना एक निवेदन पाठविले. मग तात्बडतोब सर्कल इन्सपेक्टर श्री. कदम यांनी मुलीला वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय औरंगाबाद येथे शरीक केले. आणि दासूपाटलांवर बलत्काराचा गुन्हा नोंदविला. सदर मुलीचे ऑपरेशन करण्यात आले आहे. तीचा मुलगा वारतो प्रकृतीने ठिक आहे.

औरंगाबाद येथे झालेल्या महाराष्ट्र पातळीवरील जयप्रकाश अमृत महोत्सवाच्या शिबीरास कार्यकर्ते हजर राहिले होते. तेव्हा पासून दक्षता समितीचे नांव लोकसमिती ठेवण्यात आले आहे. गांवातील मंजूराना रोजगार हमी योजनेखाली काम मिळावे म्हणून प्रयत्न केले. सद्या नांदूर मधमेश्वर कालव्याच्या कामावर मंजूर जात आहे. तिथे मंजूराची सघंटना बांधणे चालू आहे. त्याच्या रोजच्या अडचणी सोडविण्यासाठी समिती झटत असते. मंजूराना योग्य वेतन मिळावे व गैर व्यवहार होऊ नये या बद्दल समिती दक्ष आहे.

लोकनायक जयप्रकाश नारायण अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी सपूर्ण क्रांतीच्या प्रचारात समितीचे कार्यकर्ते सहभागी होते. वैजापूर तालुक्यात एकूण तीस गांवापर्यंत प्रचार सभा झाल्या. वीरगांवच्या लोकसमितीचे शिस्तबध्द व्यवस्थित काम पाहून इतर गांवातील तरुण मंडळी पूढे आली. वीर गांव हे प्रायोगिक गांव समजले होते. आता ... हनूमत गांव, लाडगांव, बाबी ईत्यादी १०-१२ गांवामध्ये लोकसमित्या स्थापण करण्यात आल्या आहे.

अल्प भुधारकाचे संघटन करुन सामुदायिक शेती करण्याचा वीर गांव लोक समितीचा मनोदय आहे. त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहे.

कार्यवाह

( डॉ. अभिकांत अहंकारी )
वैजापूर युक्रांद.

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~